**( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )**

क्रमांक पोमसं/८-अ/सा.ब.-२०१६-वि.बदल्या/प्र.अ. व का.अ. (जिल्हा)/१३/२०१६ मुंबई, दिनांक:१५/०४/२०१६

**-: आदेश :-**

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम - २००५ अन्वये, आणि शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक टीआर्एन्-०३११/१३३५/प्र.क्र.२९९/पोल-५ ब, दि.२९.३.२०११ अन्वये दिलेल्या अधिकारानुसार पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या जिल्हा लिपिक संवर्गातील प्रशासकीय अधिकारी, श्रीराम एकनाथ अकोसकर नेमणूक पोलीस आयुक्तालय, सोलापूर यांनी सध्याच्या कार्यालयात ३ वर्षे सेवा पूर्ण केल्यामुळे त्यांची पोलीस आयुक्तालय, पुणे कार्यालयात प्रशासकीय कारणांस्तव बदली करण्यात येत आहे.

२. बदलीच्या आदेशांची अंमलबजावणी तात्काळ व कार्यक्षमरित्या होण्याकरिता खालील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

- बदलीबाबतचे आदेश प्राप्त झाल्यानंतर पर्यायी प्रशासकीय अधिकाऱ्याची हजर होण्याची वाट न पाहता प्रशासकीय अधिकारी अकोसकर यांना बदली ठिकाणी हजर होण्यासाठी तात्काळ कार्यमुक्त करावे.
- प्रशासकीय अधिकारी अकोसकर यांना संबंधीत घटक प्रमुखांनी विनाविलंब रुजू करुन घ्यावे. तसेच, ते हजर झाल्याचा दिनांक ह्या कार्यालयास कळवावा. तसेच, रुजू करुन न घेतल्यास सक्तीचा प्रतीक्षाकाळ ठरवून काम न देता भत्ते देण्याचा प्रश्न उद्भवल्यास संबंधीत घटक प्रमुखास जबाबदार धरण्यात येईल.
- बदलीच्या आदेशांत बदल करुन घेण्यासाठी प्रशासकीय अधिकारी अकोसकर यांनी प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे बाह्य दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास शिस्तभंगविषयक कारवाई करण्यास पात्र ठरतील.
- प्रशासकीय अधिकारी अकोसकर यांनी त्यांची पदस्थापना केलेल्या कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे.

३. सदरचे आदेश पोलीस महासंचालकांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

**प्रवीण दीक्षित**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

पोलीस आयुक्त, सोलापूर शहर / पुणे शहर

प्रत माहितीसाठी :-

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
कार्यासन अधिकारी, का.क्र. १० व १२

**(अर्चना त्यागी)**
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन),
पोलीस महासंचालक यांचेकरिता.